# मुंबई विद्यापीठ

क्र. आरइजी/आयसीसी/२०२३-२४/०९

**परिपत्रक**

**विषय : राष्ट्रीय संविधान दिन व 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' च्या शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने २६ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहणेबाबत.....**

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित मानवविज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन आणि आंतर-विदयशाखिय अभ्यास या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थाचे संचालक, प्रभारी संचालक, यांना या परिपत्राकद्वारे असे सूचित करण्यात येते की, २६ नोव्हेंबर २०२३ रोजी संविधान दिन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सादर केलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' या पी. एचडी. प्रबंधाच्या शतकपूर्ती निमित्त 'सेंटेनरी सेलिब्रेशन्स ऑफ द प्रॉब्लेम ऑफ रुपी' या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटर- मुंबई विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) - पुणे आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स - लंडन यांच्या संयुक्त विद्यमाने **"प्रोब्लेम ऑफ रुपी, मूळ आणि त्याचे निराकरण"** या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

'राष्ट्रीय संविधान दिन' आणि डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी ' या अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथाचा शताब्दी सोहळा या दोन्ही घटनांच्या निमित्ताने ही परिषद रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ रोजी सर कावसजी जहांगीर दीक्षान्त सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे सकाळी ठीक ९.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. यामध्ये भारतीय संविधान आणि रुपयाच्या समस्येची समकालीन प्रासंगिकता' आणि बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय योगदान या विषयावर चर्चा होणार आहे.

तरी सर्व प्राचार्य व संस्थाचे संचालक, प्रभारी संचालक, यांनी आपल्या महाविद्यालयातील आणि संस्थातील किमान एक शिक्षक किंवा शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सहभाग नोंदविणे अपेक्षित आहे.

दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२३
ठिकाण : मुंबई – ४०० ०३२

(प्रा. सुनील भिरूड)
प्र-कुलसचिव

प्रति,

सर्व संलग्नित मानवविज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यास या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थाचे संचालक, प्रभारी संचालक

प्रत माहितीकरिता

१. स्वीय सहाय्यक (अ) कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई – ४०० ०३२
(ब) प्र-कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई – ४०० ०३२

Scanned with CamScanner